पुढारी

# चव्हाणवाडीतील सावरतकर कुटुंबीयांना रवळनाथ सोसायटीचा मोलाचा हात

**आजरा : प्रतिनिधी**

दीड महिन्यापूर्वी आजरा-उत्तूर मार्गावर पेंढारवाडीनजीक रस्त्यावर पेटते झाड अंगावर पडून उपचारादरम्यान अकाली मृत्यू झालेल्या चव्हाणवाडी (ता. आजरा) येथील दशरथ सावरतकर यांच्या कुटुंबीयांना रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वतीने २० हजारांचा धनादेश देऊन आर्थिक मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

दशरथ यांच्या पत्नी श्रीमती अलका, अंध वडील मारुती, लहान भाऊ प्रवीण यांनी या धनादेशाचा स्वीकार केला. दशरथचे कुटुंब भूमिहीन आहे. त्यामुळे गवंडी काम करून त्यांचा उदरनिर्वाह होत असे. आरदाळ येथे सुरू असलेले काम करून दशरथ सायंकाळी उशिरा घरी परतत असताना अज्ञाताकडून पेटवण्यात आलेल्या रस्त्याकडेचे झाड त्यांच्या डोक्यावर पडले. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. बेताची आर्थिक परिस्थिती असणाऱ्या सावरतकर कुटुंबीयांसाठी ही मोठी दुर्घटना ठरली आहे. कमवता माणूस गेल्याने उपचारासाठी जमा केलेले पैसे फेडावे लागण्याचे संकट हे त्यांच्या समोर आहे.

या पार्श्वभूमीवर 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना मदतीचा हात पुढे करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. यावेळी उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, संचालक डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, प्रा. रमेश चव्हाण, सरपंच आनंदा साळवी, उदयकुमार खरपे, कृष्णा सावरतकर, पांडुरंग कसलकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. माजी सरपंच राजेंद्र चव्हाण यांनी आभार मानले.



**चव्हाणवाडी : येथे सावरतकर कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करताना 'रवळनाथ'चे अध्यक्ष एम. एल. चौगुले, उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, प्रा. रमेश चव्हाण, व्यवस्थापक शिवानंद घुगरे व मान्यवर.**

# किलबिल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील किलबिल विद्यामंदिर व किलबिल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थाध्यक्षा अंजली हत्ती अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी हत्ती यांनी पालकांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक आनंदा घोलराखे, शहजादी पटेल यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.